**(सुधारित बातमी)**

# वक्तृत्वकला नेतृत्त्वाची संधी देते - डॉ.शंकरबाबा पापळकर

## तरुणाईच्या उत्साहात न्हाऊन निघाली अंबानगरी

## अनेक मान्यवरांनी दिल्या 'युवा महोत्सव २०२२' ला भेटी

**अमरावती -** 'युवा महोत्सव २०२२' च्या जल्लोषात तरुणाईच्या उत्साहाने अख्खी अंबानगरी न्हाऊन निघाली असून रसिक या पर्वणीचा भरभरून आनंद घेत आहेत. युवा महोत्सवाला अनेक गणमान्य मान्यवरांनी भेटी देऊन स्पर्धकांना शुभेच्छा देत त्यांचा आनंद द्विगुणीत केला आहे. अनाथांचा नाथ डॉ,शंकरबाबा पापळकर यांनाही या महोत्सवाला भेट देण्याचा मोह आवरला नाही आणि त्यांनी अचानक श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र सभागृहात सुरु असलेल्या वक्तृत्व स्पर्धेचा आस्वाद घेतला.

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने आयोजित संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवाला अनेक मान्यवरांनी भेटी देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला व या महोत्सवाच्या सुरेख व शिस्तबद्ध आयोजनासाठी आयोजकांचे कौतुक केले. या महोत्सवाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने डी.लिट. देऊन सन्मानित केलेले प्रसिद्ध समाजसेवक डॉ.शंकरबाबा पापळकर, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. डॉ.रणजीत पाटील, विदर्भ युथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, माजी आ. दादासाहेब खोटरे, किरण पातुरकर, डॉ.अविनाश चौधरी, सिनेट सदस्य अमोल ठाकरे, उद्योजक अमोल चवणे यांच्यासह शहरातील मान्यवर नागरिकांनी व अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या. सर्व मान्यवरांचे मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे आणि विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजीव बोरकर यांनी स्वागत केले.

वक्तृत्वकला ही व्यक्तिमत्त्वाला बदलण्याची संजीवनी असून वक्तृत्व देशाला पुढे नेऊ शकते. कोणत्याही क्षेत्रात नेतृत्व करण्याची संधी ही कला देते, या शब्दात डॉ.शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी स्पर्धकांशी संवाद साधला. तर बावनकुळे यांनी, या भव्य आयोजनाची शासन दरबारी दखल घेण्यासाठी महोत्सवाची माहिती शासनाला देऊ, असे सांगून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. डॉ.नितीन धांडे यांनी मार्गदर्शन करताना युवा महोत्सवासारख्या आयोजानामधून विद्यार्थ्यांना आपली कला विकसित करण्याची संधी मिळते. विविध कलांचा जीवनात कोणत्याही क्षेत्रात फायदा मिळतो, अशा शब्दात कलेचे जीवनातील महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांच्या या भेटीचे वेळी युवा महोत्सव निवड समितीचे अध्यक्ष डॉ.प्रफुल्ल गवई, महोत्सवाचे समन्वयक डॉ.सुभाष गावंडे, सहसमन्वयक डॉ.वैशाली देशमुख, डॉ.कुमार बोबडे, प्रफुल्ल घवळे, डॉ.संगीता भुयार, डॉ.वंदना देशमुख आदींची उपस्थिती होती.

---

Sobat foto